नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९४ Issue - 94 | वार गुरुवार दि. २१ ऑगस्ट २०२५ Blow- Thursday Date 21 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुसळधार पावसाचा शेती पिकांना मोठा फटका

## कृषीमंत्र्यांची माहिती; राज्यातील १९ जिल्ह्यात २० लाख १२ हजार ७७५ एक्कर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सध्या मुसळधार पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक भागात या पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. नदी नाल्यांना पूर आले आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान, या पावसाचा मोठा फटका शेती पिकांना देखील बसला आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २० लाख १२ हजार एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालं आहे. त्यांनी वाशिममध्ये पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

अतिवृष्टीमुळे राज्यातील १९ जिल्ह्यात २० लाख १२ हजार ७७५ एक्कर क्षेत्रावरील सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासह अन्य पिकांचं नुकसान झाल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम मध्ये पत्रकार परिषदेत बोलताना दिली. राज्यात सर्वाधिक ७ लाख १३ हजार ८५७ एक्कर क्षेत्राचे नुकसान नांदेड जिल्ह्यात झाला असून त्यापाठोपाठ वाशिम जिल्ह्यात ४ लाख ११ हजार ३९२ एकर क्षेत्रावर पिकाचे नुकसान झालंय. मात्र क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास सर्वाधिक नुकसान वाशिम जिल्ह्यात



असल्याचही भरणे यांनी सांगितले, या नुकसानीचे पंचनामे सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं भरणे यांनी सांगितलंय.

१८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला

राज्यातील ऑगस्ट २०२५ मधील अतिवृष्टीमुळे खरीप हंगामावर मोठा परिणाम झाला आहे. राज्यातील तब्बल १९ जिल्ह्यांमधील १८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला असून मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, ८०५११० हेक्टर म्हणजे तब्बल २०१२७७५ एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १०००० हेक्टरपेक्षा जास्त नुकसानग्रस्त क्षेत्र असलेले ११ जिल्हे समोर आले आहेत.

**सर्वाधिक नुकसानग्रस्त जिल्हे कोणते?**

**नांदेड :** २८५५४३ हेक्टरवरकील पिकांचे नुकसान

**वाशिम** : १६४५५७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**यवतमाळ** : ८०९६९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**बुलढाणा** : ७४४०५ हेक्टरवरल पिकांचे नुकसान

**अकोला** : ४३७०३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**सोलापूर** : ४१४७२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**हिंगोली** : ४०००० हेक्टरवरील पिकांचे नुकसान

गेल्या दोन ते तीन दिवसापासून राज्यात मुसळधार पावसानं धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे पाणीपुरवठा, वीज आणि वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. नागरिकांना किराणा आणि औषधे मिळवणे कठीण झाले असून प्रशासनाकडून मदतीची मागणी होत आहे.

# दोषी मंत्र्यांना हटवण्याचे विधेयक मांडताच संसदेत मोठा गदारोळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : लोकसभेत मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तीन महत्त्वाचे विधेयक सादर केले आहेत. यावेळी मोठा गदारोळ झाल्याचे पाहायला मिळाले. या विधेयकानुसार, जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्यावर पाच वर्षांहून अधिक शिक्षेची तरतुदी करण्यात आली आणि ते ३० दिवसांहून अधिक काळ न्यायालयीन कोठडीत राहिले, तर त्यांना पदाचा राजीनामा देणे अनिवार्य ठरणार आहे.

विधेयक सादर होताच विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहात प्रचंड गोंधळ घातला. अनेक खासदारांनी गृहमंत्र्यांच्या दिशेने त्या विधेयकाची फाडलेली प्रत फेकली. एवढेच नव्हे तर कागदाचे तुकडे हवेत उडवून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली, यामुळे सभागृहात मोठा गदारोळ झाला.

अमित शहा यांनी विधेयक मांडताना असेही स्पष्ट केले की, सरकार हे विधेयक संसदीय संयुक्त समितीकडे (गझउ) पाठवण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. जेणेकरून या विषयावर साधक-बाधक चर्चा होऊ शकेल. मात्र तरीही विरोधकांचा आक्रोश काही कमी झाला नाही. काही खासदारांनी तर गृहमंत्र्यांसमोरील माइकही मोडण्याचा प्रयत्न केला.

लोकसभेतील वातावरण तणावपूर्ण झाले होते. टीएमसीचे खासदार कल्याण बनर्जी यांनी विधेयक सादर होताच घोषणाबाजीला सुरुवात केली आणि इतर विरोधी खासदारही त्यांच्यापाठोपाठ वेलमध्ये उतरले आणि गोंधळ घातला. विरोधकांच्या वाढत्या गोंधळामुळे अमित शहांनी स्वत:चेच उदाहरण देत वातावरण शांत करण्यात प्रयत्न केला. शहा म्हणाले, शहा म्हणाले, 'मी गुजरातमध्ये मंत्री असताना माझ्यावर आरोप झाले होते. मी पदाचा राजीनामा दिला आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले. यानंतर, आरोपांमधून निर्दोष मुक्त झाल्यावर मी पुन्हा पद स्वीकारले.'

शहांनी यावेळी अधोरेखित केले की, 'राजकारणात शुद्धता राखण्यासाठी नैतिकता बाळगणे आवश्यक आहे आणि आपण आपल्या जबाबदारीपासून पळून जाऊ नये. दरम्यान, या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. राजकीय वर्तुळात आता या विधेयकावरून सरकार आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्ष होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# क्रीडा दिनानिमित राज्यभर २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान क्रीडा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : क्रीडा दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय महोत्सवात राज्यभर विविध कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी कार्यप्रणाली तयार करण्यात यावी. त्यासाठीचा निधी तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी दिली.



पद्मभूषण मेजर ध्यानचंद सिंह यांच्या जन्मदिनानिमित्त राज्यभर २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून त्याच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील क्रीडा अधिकारी सहभागी झाले होते. मंत्री ॲड.कोकाटे म्हणाले की, केंद्र सरकारच्या क्रीडा धोरणाच्या धर्तीवर नवे क्रीडा धोरण तयार करण्यात यावे. तसेच राज्यातील खेळाडूंच्या अपेक्षेप्रमाणे बदल करावे. क्रीडा महोत्सवात जिल्हा तसे तालुकास्तरावर विविध क्रीडा कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करावे. शाळा महाविद्यालय विद्यापीठांना तसेच जिल्ह्यातील क्रीडापटूंना या महोत्सवात सहभागी करून घ्यावे. केंद्र सरकारने दिलेल्या सूचनाप्रमाणे २९ ऑगस्ट रोजी मेजर ध्यानचंद यांना अभिवादन, फिट इंडिया शपथ आणि ६० मिनिटे संघ खेळ व विरंगुळ्याचे खेळ आयोजित करावे.

३० ऑगस्ट रोजी स्थानिक/आदिवासी खेळ, इनडोअर स्पोर्ट्स, शाळा/महाविद्यालय स्तरावरील क्रीडा, वादविवाद, फिटनेस व्याख्याने, क्रीडा स्पर्धांचे आयोजन करावे. ३१ ऑगस्ट रोजी संडेज ऑन सायकल डींपवरीे प ुलश्रश या उपक्रमात देशभरातील नागरिकांचा सहभाग करून उपक्रम राबवावा.

या तीन दिवसीय क्रीडा महोत्सवात दोर खेचणे (ढींसे ष ुरी), ५० मी. शर्यत, रिले रेस, मॅरेथॉन, चमच्यातील गोळी शर्यत, गोणपाट शर्यत, योग, क्रिकेट, सायकलिंग, पिठ्ठू सारखे स्थानिक खेळ, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, दोरीवर उड्या मारणे, बुद्धिबळ, ऑलिंपिक मूल्य शिक्षण कार्यक्रम तसेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी ३०० मी. स्पीड वॉक, १ किमी वॉक, योग, श्वसनाचे व्यायाम, सांध्यांचे व्यायाम, स्ट्रेचिंग चॅलेंज, सायकलिंग या क्रीडा प्रकाराचा सहभाग करावा.

**१ कोटींचा दंड आणि ३ वर्ष जेल**

**केंद्र सरकारचा मोठा 'गेम'**

# ऑनलाईन सट्टेबाजीवर चाप बसणार, लोकसभेत विधेयक मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाात ऑनलाईन सट्टाबाजी ही सर्रासपणे सुरु आहे. गेल्या काही वर्षांपासून ऑनलाईन सट्टेबाजी सर्रासपणे सुरु असलेली बघायला मिळत आहे. तसेच या मोठमोठ्या ऑनलाईन सट्टेबाजीच्या ॲप्सची मोठमोठ्या अभिनेत्यांकडून जाहिरात करण्यात येत होती. यामुळे सर्वसामान्य नागरीक चांगलेच संतापलेले बघायला मिळाले. अनेकांकडून याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात आलं. अनेकांकडून या बेटिंग ॲप्सवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. कारण या माध्यमातून अनेक जण देशोधडीला लागले. अनेकांचे संसार यामुळे उद्ध्वस्त झाले. अनेक जणांना याचं गंभीर व्यसन लागलं. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांकडून आणि जबाबदार नागरिकांकडून वारंवार यावर बंदीची मागणी केली जात होती. अखेर केंद्र सरकारने याबाबतच्या तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे. आता या ऑनलाईन गेमिंगवर कायमची चाप बसणार आहे. विशेष म्हणजे अशाप्रकारचे सेवा प्रदान करणाऱ्यांना आता आगामी काळात तब्बल १ कोटींचा दंडही आकारला जाण्याची शक्यता आहे.



संसदेचं सध्या पावसाळी अधिवशेन सुरु आहे. केंद्र सरकारकडून आज लोकसभेत ऑनलाईन गेमिंग संबंधित एक विधेयक मांडण्यात आलं. हे विधेयक मंजूर देखील करण्यात आलं. पैसे लावून खेळल्या जाणाऱ्या ऑनलाईन गेमवर प्रतिबंध लावण्याशी संबंधित हे विधेयक आज लोकसभेत मंजूर करण्यात आलं. ऑनलाईन गेम्सचं व्यसन, आणि आर्थिक फसवणूक यांवर आळा बसावा यासाठी हे विधेयक आणण्यात आलं आहे.

ऑनलाईन गेमिंग संवर्धन आणि विनियमन विधेयक २०२५ हे ऑनलाईन मनी गेम्स संबंधित जाहिरात तथा या माध्यमातून बँकेच्या माध्यमातून पैशांच्या होणाऱ्या देवाणघेवाणवर बंदी आणणार आहे. केंद्रीय सूचना तथा प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयक मांडल्यानंतर हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आलं. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेची कार्यवाही दिवसभरासाठी स्थगित करण्यात आली. ऑनलाईन मनी गेम हे ते गेम्स आहेत ज्या माध्यमातून युजर्स पैसा आणि इतर फायद्यांसाठी पैसा लावून खेळतो.

हे विधेयक सर्व ऑनलाईन सट्टेबाजी आणि जुगारला बेकायदेशीर घोषित करेल. ऑनलाईन फँटसी गेम्स पासून ऑनलाईन जुगार जसे की पोकर, रम्मी आणि इतर कार्ड गेम्स तथा ऑनलाई लॉटरी सुद्धा या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर बेकायदेशीर घोषित होतील. लोकसभेनंतर राज्यसभेत विधेयक पारित झाल्यानंतर या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होईल. यानंतर ऑनलाईन गेमिंग प्रदान करणाऱ्यांना तीन वर्षांचा कारावास तथा १ कोटी रुपयांच्या दंडाची शिक्षा होण्याची शक्यता आहे.

# ओबीसी हिताचा निर्णय पवारांनीच घेतला!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राजकीय वातावरण तापलं असून २९ ऑगस्ट रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईकडे मोर्चा वळवणार आहेत. मात्र, ओसीबी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन काही नेत्यांकडून जाणीवपूर्वक शरद पवारांना लक्ष्य केलं जातं. सध्या ओबीसी आंदोलनामुळे चर्चेत आलेल्या लक्ष्मण हाके यांनीही गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्यावर आक्रमकपणे टीका केली असून आमदार गोपीचंद पडळकर हेही सातत्याने शरद पवारांना लक्ष्य करताना दिसून येतात. आता, शरद पवारांवर टीका करणाऱ्यांवर राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख आणि माजी मंत्री महादेव जानकर यांनी यांनी पलटवार केला आहे. शरद पवारांसाठी ढाल बनून जानकर पुढे आले असून ओबीसी समाजासाठी शरद पवारांचं योगदान असल्याचंही त्यांनी म्हटलं.

क्रांती दिनाचे औचित्य साधत शरद पवारांच्या



राष्ट्रवादीने ओबीसी मंडल यात्रा सुरू केल्यानंतर महायुतीच्या नेत्यांकडून त्यांच्यावर टीका केली जात आहे. मात्र, शरद पवारांवर टीका करणाऱ्यांना आता महादेव जानकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मंडल यात्रा आज जालन्यात दाखल झाली आहे. ओबीसीच्या हिताचे प्रश्न घेऊन ही यात्रा जात असल्यामुळे मंडल यात्रेचे स्वागत करण्यासाठी मी स्वतः हजर झालो असल्याचं जानकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं. तसेच ओबीसीच्या हिताचा निर्णय घ्यायचे काम शरद पवार यांनी केलं आहे. आंब्याच्याच झाडाला माणसं दगड मारतात, ज्याला फळ नसतं त्याला कोणी दगड मारत नाही, असे म्हणत ओबीसीच्या भूमिकेवरुन शरद पवारांवर टीका करणाऱ्यांना जानकरांनी टोला लगावला आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत महायुतीसोबत असलेल्या महादेव जानकर यांनी पुन्हा महायुतीची साथ सोडली आहे. गेल्या काही

**शरद पवारांसाठी महादेव जानकर ढाल बनले**

दिवसांपूर्वी मराठीच्या मुद्द्यावर एकत्र येत ते ठाकरे बंधूंच्या मेळाव्यातही दिसून आले होते. तर, राज्यातील महायुती सरकारवर आणि भाजपवर टीका करताना पाहायला मिळत आहेत. त्यामुळे, महादेव जानकर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महाविकास आघाडीसोबत येतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यात मंडल यात्रा काढण्यात येत आहे. क्रांती दिनाचे औचित्य साधत नागपुरातून सुरू केलेल्या मंडल यात्रेला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नागपूरमध्ये हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. दरम्यान, शरद पवार यांनी काढलेल्या मंडल यात्रेवर महायुती आणि भाजपनं सडकून टीका केली टीका केली आहे. तर, वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी टीका करत गंभीर आरोप केले होते. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ओबीसींच्या स्कॉलरशिपला राष्ट्रवादीकडून विरोध करण्यात आला होता. ओबीसी हा श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जातोय, श्रीमंत मराठा हा एनसीपीचा बेस आहे. श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात ओबीसी जाणार नाही, हाच या पाठीमागचा राजकीय हेतू आहे. असा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला आहे.

## संपादकीय....

### सट्टेबाजांवर चाप

देशाात ऑनलाईन सट्टाबाजी ही सर्रासपणे सुरु आहे. गेल्या काही वर्षांपासून ऑनलाईन सट्टेबाजी सर्रासपणे सुरु असलेली बघायला मिळत आहे. तसेच या मोठमोठ्या ऑनलाईन सट्टेबाजीच्या ॲप्सची मोठमोठ्या अभिनेत्यांकडून जाहिरात करण्यात येत होती. यामुळे सर्वसामान्य नागरीक चांगलेच संतापलेले बघायला मिळाले. अनेकांकडून याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात आलं. अनेकांकडून या बेटिंग ॲप्सवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. कारण या माध्यमातून अनेक जण देशोधडीला लागले. अनेकांचे संसार यामुळे उद्ध्वस्त झाले. अनेक जणांना याचं गंभीर व्यसन लागलं. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांकडून आणि जबाबदार नागरिकांकडून वारंवार यावर बंदीची मागणी केली जात होती. अखेर केंद्र सरकारने याबाबतच्या तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे. आता या ऑनलाईन गेमिंगवर कायमची चाप बसणार आहे. विशेष म्हणजे अशाप्रकारचे सेवा प्रदान करणाऱ्यांना आता आगामी काळात तब्बल १ कोटींचा दंडही आकारला जाण्याची शक्यता आहे. संसदेचं सध्या पावसाळी अधिवशेन सुरु आहे. केंद्र सरकारकडून आज लोकसभेत ऑनलाईन गेमिंग संबंधित एक विधेयक मांडण्यात आलं. हे विधेयक मंजूर देखील करण्यात आलं. पैसे लावून खेळल्या जाणाऱ्या ऑनलाईन गेमवर प्रतिबंध लावण्याशी संबंधित हे विधेयक आज लोकसभेत मंजूर करण्यात आलं. ऑनलाईन गेम्सचं व्यसन, आणि आर्थिक फसवणूक यांवर आळा बसावा यासाठी हे विधेयक आणण्यात आलं आहे. ऑनलाईन गेमिंग संवर्धन आणि विनियमन विधेयक २०२५ हे ऑनलाईन मनी गेम्स संबंधित जाहिरात तथा या माध्यमातून बँकेच्या माध्यमातून पैशांच्या होणाऱ्या देवाणघेवाणवर बंदी आणणार आहे. केंद्रीय सूचना तथा प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयक मांडल्यानंतर हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आलं. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेची कार्यवाही दिवसभरासाठी स्थगित करण्यात आली. ऑनलाईन मनी गेम हे ते गेम्स आहेत ज्या माध्यमातून युजर्स पैसा आणि इतर फायद्यांसाठी पैसा लावून खेळतो. हे विधेयक सर्व ऑनलाईन सट्टेबाजी आणि जुगारला बेकायदेशीर घोषित करेल. ऑनलाईन फँटसी गेम्स पासून ऑनलाईन जुगार जसे की पोकर, रम्मी आणि इतर कार्ड गेम्स तथा ऑनलाई लॉटरी सुद्धा या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर बेकायदेशीर घोषित होतील.

# भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते तर तलवारीच्या तयांच्या, न्यारेच टोक असते : महाकवी वामनदादा कर्डक

## फुशाआ स्टडी सर्कलची १२७ वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्म सेवा संघ बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने जय भवानी नगर, एन-४, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते. तर तलवारीच्या तयांच्या, न्यारेच टोक असते. या महाकवी वामनदादा कर्डक यांच्या चळवळीतील विधानावर जयंती व स्वातंत्र्य दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर १२७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १५ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, एकजिनसी भारतीय समाज निर्माण करण्यासाठी सर्व उपासक व नागरिकांना प्रशिक्षित केले पाहिजे. कधीतरी कुणाला काहीतरी बोलायचे असते पण त्याला कुणी संधीच देत नाही? करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सर्वांना संधी देऊन प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. नेतृत्वहीन समाजाला नेतृत्व प्रदान करणा-यांची दहा-दहा गटात विभागणी झाली असेल तर वामनदादा कर्डकानी व्यक्त केलेले भिमाच्या मतांची ती पाच लोक कुठे आहेत? कांबळे साहेबांनी म्हटल्याप्रमाणे समाजात फार विद्वान माणसे असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यात शील व सौजन्य नसल्याने ती समाजासाठी हिस्त्र पशु पेक्षाही धोकादायक ठरत आहेत.

कुठल्याही आशा आकांक्षाची पूर्तता होण्यासाठी किंमत मोजावी लागत असते. तर मग साऱ्यांना शासन शासनकर्ती जमात व्हावी, असे वाटत असेल तर मग त्याची आपण किंमत मोजत आहोत काय? समाजाला जागृत करून त्यांना त्यांचे हक्क अधिकार मिळावेत याकरिता लढा देण्यासाठी संघटित होणे आवश्यक असते आणि ते संघटित होण्यासाठी संघर्ष करावा लागत असतो. त्यासाठी आपण कटिबद्ध आहोत काय? म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९२४ ला सुशिक्षित करा संघर्ष करा आणि संघटित करा असा त्रिसूत्री संदेश दिला असला तरी २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही दिल सोडू नका. असा पंचसूत्री संदेश दिला होता. अशाप्रकारे सुशिक्षित करणारी, संघर्ष करणारी, संघटित करणारी, आत्मविश्वास बाळगणारी व कधीही धीर न सोडणारी हीच ती पाच लोक आहेत, जी वामनदादा कर्डकांना अपेक्षित होती. त्यांचा आपण शोध घेतला पाहिजे. करिता समाजाला जागृत करण्यासाठी स्वातंत्र्यदिनी जयंती निमित्त सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या सविता अभ्यंकर म्हणाल्या की, देशाच्या स्वातंत्र्याला ७८ वर्षे झाली असली तरी देशातील माणसं मात्र अजूनही पारतंत्र्यातच असल्यासारखी पहायला मिळत आहेत. आदर्श विचारधारेला पुढे घेऊन जाताना बुद्धाची वाणी, कबीराचे दोहे, रमाईचे त्यागी जीवन, वामनाची लेखणी, बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान याची सांगड घातली पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना शाहीर उत्तमराव म्हस्के म्हणाले की, वामनदादांनी घराघरात गीताच्या माध्यमातून परिवर्तनवादी चळवळीचे विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले आहे. तसेच त्यांनी 'सारे मानव प्राणी एक व्हा रे', 'तुझीच कमाई आहे ग भिमाई' इत्यादी गीतांचा हवाला देऊन प्रबोधन केले आहे.

याप्रसंगी रमेश जोगदंड म्हणाले की, सामाजिक स्वातंत्र्य गरजेचे असताना शासकीय स्तरावर मर्यादा घालणे म्हणजे स्वातंत्र्याची गळचेपी होय. करिता आपण अंधारात चाचपडत न राहता प्रकाशाकडे वळले पाहिजे. अरविंद कांबळे म्हणाले की, चळवळीची वाहतात होत असल्याने समाजात निराशा पसरत चालली आहे. समाजात प्रचंड विद्वान माणसे असताना त्यांचा सर्व वेळ इतरांना नाव ठेवणे आणि दोष देण्यातच खर्च होत आहे. खऱ्या नेतृत्वाला नेस्तनाबूत करण्यासाठी शत्रूसह आपलीच दलाली करणारी बेइमान माणसे कार्यरत आहेत. उद्धव बनसोडे म्हणाले की, मान्यवर कांशीराम साहेबांनी समाजाला सत्तेत बसवून खरे कार्य केले आहे. भीम के लगते जिगर, आधे इधर आधे उधर या स्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पंडित बोर्डे म्हणाले की, बाबासाहेबांच्या सर्वांगीण विचाराचे पेरणी करणारे शिलेदार म्हणजे वामनदादा कर्डक होय. ती पाच माणसे कोण? याचा शोध घेतला तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात पुढारलेली माणसे होय. करिता शीलवान, गुणवान, कर्तुत्ववान, बुद्धिमान, प्रज्ञावान माणसं तयार केली पाहिजेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन एड. विलास रामटेके तर प्रास्ताविक व आभार गौतम पारखे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, आर. जी. देठे, अशोक सुरडकर, गोविंद वाहुळे, टी. एन. सोनवणे, डी. एस. सराटे, ए. ए. सोनवणे, रामदास अभ्यंकर, सिद्धार्थ बंनकर, रामभाऊ मते, डॉ. एस. के. जमधाडे, प्रल्हाद भदर्गे, प्रकाश जोगदंड, शंकर अंभोरे, अरुणाबाई भदर्गे, सुशीलाबाई गवई, आर. पी. गायकवाड, रजनीकांत दिवेकर, यशवंत कवडे, रमेश जोगदंडे, पंडितराव बोर्डे, चंद्रभान खंडारे, रावसाहेब सोनकांबळे, बुद्धभूषण साळवे, आराध्या सोनकांबळे, पद्मिनी कवडे, शारदा जमदाडे, नेहा आठवले, निर्मला सोनवणे, सुषमा मते, कुशीवार्ता सोनकांबळे, अनामी मोरे, रमेश साळवे, अरविंद कांबळे, विजय बचके इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.




# अनंत चैतन्य प्रशालेत ७९ वा स्वातंत्र्योत्सव उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित, अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय व सेमी इंग्रजी विद्यालय हन्नूर येथे आज ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.प्रारंभी हन्नूर गावचे प्रतिष्ठित नागरीक श्री. कल्लप्पा विभुते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांस सुरुवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हन्नूर गावचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी हे होते.या कार्यक्रमाची सुरूवात कु. रेणुका हेगडे, कोमल चव्हाण, श्रद्धा इरवाडकर, शिवानी बाळशंकर यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने करण्यात आली. याचवेळी कु. स्वरुपा पुजारी, आरती पुजारी, वैदेही घोडके, श्रृती घोडके, रोहिणी घोडके यांनी देशभक्तीपर गीत सादर केले.यानंतर दहावी व बारावीत विशिष्ट विषयात सर्वाधिक गुण मिळवलेल्या व प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या व इ. ५ वी ते ९ वी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे विविध मान्यवरांच्यावतीने ठेवण्यात आलेल्या रोख बक्षीसांने गौरव करण्यात आले. यावेळी कु. श्रद्धा जळकोटे (इ. १० वी) या विद्यार्थिनीचे हरवलेले सोन्याचे अंदाजे १००००/- रु. किंमतीचे कानातील फुल प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल कु. वैष्णवी स्वामीनाथ भरमशेट्टी ( इ. ७ वी ) हिचे यावेळी ५०१/- रु. चे रोख बक्षीस देऊन विशेष कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी प्रशालेच्या विद्यार्थिनी कु. अंकिता किरनाळीकर, शिवानी बाळशंकर, दिव्यांनी निकम यांनी अतिशय सुंदर मनोगत व्यक्त केले. तर अंबिका जळकोटे हिने देशभक्तीपर कविता सादर केली. तर सेमी इंग्रजी विद्यालयाच्या भिमाशंकर घोडके, सृष्टी हेगडे, भाविका चव्हाण, पियुष चव्हाण या चिमुकल्यांचीही खुप छान भाषणे झाली. तर एल. के. जी. व पहिली, दुसरी, तिसरीच्या मुलां- मुलांनी सुंदर नृत्य सादर केले.यावेळी हन्नूर च्या सरपंच सौ. सोनालीताई तळवार, उपसरपंच मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी श्री.चंद्रकांत थोरात, प्रतिष्ठित नागरीक, ग्रामस्थ,माजी विद्यार्थी, सशस्त्र सीमा सुरक्षा बल हन्नूर चे जवान, अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागाचे कर्मचारी, जि. प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत राठोड गुरुजी व त्यांचा संपूर्ण शिक्षक स्टाफ, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.अशोक साखरे, पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे व समस्त शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग, सेमी विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर स्टाफ व जि. प.,सेमी व प्रशालेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अप्पासाहेब काळे सर, सुत्रसंचालन सौ. मल्लम्मा चपळगाव मॅडम यांनी केले तर आभार सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी मानले. खाऊवाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आज अत्यंत नियोजनबद्ध व उत्कृष्ट पद्धतीने साजरा केलेल्या प्रशालेतील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ.शांभवीताई कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी.ई.ओ.सौ.रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी प्रशंसा केली.

# सिन्नर -कोमलवाडी विद्यालयात समाज दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर : मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय कोमलवाडी येथे १९ ऑगस्ट रोजी संस्थेचे आद्य कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती म्हणजेच समाज दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेच्या सर्व कर्मवीरांचा महिमा वर्णन केला. तसेच शालेय समितीचे अध्यक्ष शरद घुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सर्व कर्मवीरांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शाळे समिती सदस्य सोमनाथ जाधव यांनी आपल्या मनोगततून कर्मवीरांच्या कार्याची माहिती दिली. तसेच अध्यक्ष भाषणातून शरद घुले यांनी देखील सर्व कर्मवीरांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी एस.एस.सी.परीक्षा मार्च २०२५ मध्ये उत्तीर्ण प्रथम पाच क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरित करण्यात आले. तसेच ठेवी वरील व देणगी स्वरूपात बक्षीस इयत्ता पाचवी ते दहावीच्या प्रथम पाच क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना देखील बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख मनीषा गोराडे यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थी तसेच देश सेवेत कार्यरत असलेला सैनिक तुषार बोंबले याकडून आपल्या माता-पिता करवी बाळासाहेब बोंबले व सौ. बोंबले ताई यांच्याकडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यश घुले याने कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या बद्दल मनोगत व्यक्त केले .तनुजा उगले तिने संस्थेचा इतिहास आपल्या मनोगतातून व्यक्त तसेच ऋतुजा उगले तिने कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या बद्दल माहिती सांगितली.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक शालेय समि



ती अध्यक्ष शरद घुले, लहान कोंडाजी घुले, सोमनाथ जाधव, लहानू घुले, खंडू बोंबले, तानाजी बोंबले, राजाराम उगले, ठोके सर, सचिन गिते, सौरभ कमानकर, सागर बस्ते, सुदर्शन गांडुळे, शरद टेमगर, कीर्ती गवारे, शितल रायते, ऋतुजा वाघ यांसह सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वाती जोंधळे यांनी केले.

# डुबेरे जनता विद्यालयात समाजदिन, विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक संस्थेचे संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस समाजदिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे होते. देणगीदार संदेश वाजे यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कर्म.रावसाहेब थोरात, कर्म. काकासाहेब वाघ, कर्म. अण्णासाहेब मुरकुटे,कर्म. भाऊसाहेब हिरे, कर्म. बाबुराव ठाकरे,कर्म.वसंतराव पवार, कर्म.विठ्ठलराव हांडे, छत्रपती शिवाजी महाराज आदींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. गीतमंचाने समाजगीत सादर केले.

व्यासपीठावर उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने,सरपंच रामनाथ पावसे, शालेय समितीचे सदस्य भाऊ वारुंगसे, विजय दादा वाजे, काशिनाथ वाजे,देणगीदार भगवान वाजे,कारभारी वारुंगसे,दामोदर कुंदे,शंकरराव वामने,माजी सरपंच शरद माळी, अशोकराव गवळी, नामदेव पावसे,वसंतराव जाधव,पुंजा आव्हाड,समीर सय्यद आदी उपस्थित होते.कर्मवीरांच्या जीवन व कार्याचा परिचय प्रिया वाजे,आराध्या वाजे ,निलम सदगीर , स्वरा वारुंगसे ,अनन्या जाधव,स्वरांजली सहाणे या विद्यार्थ्यासह उपशिक्षक रेवणनाथ कांगणे यांनी करून दिला. विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले यांनी प्रास्ताविकात संस्थेचा व कर्मवीरांचा परिचय करून उपस्थितांचे स्वागत केले.

एस.एस.सी व एच.एच.सी परीक्षेत पहिल्या १ ते ५ क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसह विविध स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांनी दिलेल्या देणगीतून मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.तसेच गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर व कंपास पेटी आदींचे वाटप करण्यात आले.बक्षिसांचे नियोजन व यादी वाचन कचेश्वर शिंदे, सुनिल ससाणे, कल्पना शिंदे, जयश्री गोहाड, रामदास वारुंगसे यांनी केले.

यावेळी बोलतांना शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे म्हणाले की, कर्मवीरांनी स्वतः च्या प्रपंचाचा विचार न करता समाजाच्या प्रपंचाचा विचार करत आपले आयुष्य शैक्षणिक कार्यासाठी वेचले. विद्यार्थ्यांसह इतरांनी कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घ्यावा असे आव्हान वाजे यांनी केले. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात जिद्द चिकाटी ठेवल्यास यश निश्चित मिळते. असेही ते म्हणाले.

समाजदिनानिमित्त रांगोळी काढणे,पुष्परचना,कबडडी, स्लो सायकल आदिं सह विविध मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सलग दोन दिवस संपन्न




झालेल्या स्पर्धेचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी आभार पर्यवेक्षिका जयश्री पगारे यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, संस्थेचे सभासद, हितचिंतक, देणगीदार व विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भातसा धरण पुन्हा ओव्हर फ्लो; मुसळधार पावसाने धरणात पाण्याचा येवा सुरूच ...

## नदी काठच्या गावांना प्रशासनाचा धोक्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर -भातसा नगर / प्रफुल्ल शेवाळे : मुंबईला पाणीपुरवठा करण्यामध्ये भातसा धरणाचा मोठा वाटा आहे.

शहापूर तालुक्यातील याच भातसा धरण क्षेत्रात गेल्या ४/५ दिवसा पासून सतत पाऊस पडत आहे. गेल्या महिन्यात २३ जुलै ला धरणाचे ५ दरवाजे उघडण्यात आले होते. त्यानंतर पावसाचे प्रमाण काहीसे कमी झाल्यानंतर दरवाजे बंद करण्यात आले होते. आज मात्र भातसा धरनाचे दरवाचे सकाळी १० च्या सुमारास १.५०मी उघडण्यात आले आणि नंतर १०:४५ वा धरणाचे दरवाजे आणखीन ०.२५मी. ने म्हणजेच सध्या धरणाचे ५ दरवाजे १.७५ मी. ने उघडण्यात आले आहे. यामुळे धरण क्षेत्र परिसरातील सावरशेत पुलावरून धरणाचे पाणी जाऊ लागले आहे. यामुळे शहापूर सापगावं पुलावर सुद्धा पाणी येण्याची शक्यता आहे. जलसंपदार विभागने काल खबरदारीचा उपाय म्हणून सूचना पत्र प्रसारित केले आहे यात नदी काटच्या गावांना धोक्याचा इशारा देण्यात आला आहे.

अधिकृत माहिती नुसार दिनांक:- २०/०८/२०२५ रोजी (सकाळी १०:३०)

१) भातसा धरण-

पाण्याची पातळी - १४०.६९ मीटर नोंद करण्यात आली आहे.

धरणात एकूण जलसाठा - ९०४.२३८ मिमी३ (९५.९८%) इतका आहे.

स्पिलवे डिस्चार्ज :- सर्व दरवाजे आधीच १.५० मीटरने उघडले आहेत



आता सकाळी १०:४५ वाजता सर्व दरवाजे उघडण्यात २५ सेमीने वाढ धरणाची पातळी राखण्यासाठी सर्व दरवाजे उघडण्यात एकूण १.७५ मीटर ने उघडन्यात आले आहेत.

सर्व ५ गेट्समधून विसर्ग पाण्याचा विसर्ग २८२६२ क्युसेकस असणार आहे.

धरण क्षेत्रात १ जूनपासून एकूण पाऊस २२४३ मिमी इतका नोंदणी करण्यात आला आहे.

# २२ व २३ रोजी घोळसगाव येथे देशभक्ती सह विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील घोळसगाव येथील स्वयं जागृत नवसाला पावणारा सर्व धर्मीय श्रद्धास्थान शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान शनी अमावस्या यात्रा महोत्सव निमित्य शुक्रवार २२ व शनिवार २३ ऑगस्ट रोजी देशभक्ती सह विवध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित केले असल्याची माहिती पंच कमिटी अध्यक्ष अप्पासाहेब किवडे यांनी दिली आहे.

जय भारत माता सेवा समिती राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात शनी अमावास्या यात्रा महोत्सव कार्यक्रम नेहमी भक्ती भावनेने मोठ्या उत्साहात साजरी केल्या जातात.प्रत्येक शनी अमावस्या यात्रेस तुळजापूर, उमरगा, आंळद व अक्कलकोट तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.यामुळे यंदा यात्रा कमिटीचे वतीने शनी अमावास्या यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे. शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी दिवसभरात देशभक्तीसह विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून रात्रभर देशभक्ती भजन,भारुड,गीगी पदा आदी भरगच्च देशभक्ती व धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेल्या आहेत.

शनिवार दि. २३ ऑगस्ट पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान



पर्यत निघणार आहे. यानंतर सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भाविक भक्तांनी सदगुरूचा दर्शन आणि महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावी असे आवाहन पंच कमिटीच्या सचिव राजू काळे यांनी केले आहे.

# वागदरी मंडलमध्ये खरीप पिकाचे नुकसान भरपाई देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : वागदरीसह परिसरातील गोगाव खैराट भुरीकवठे कीरनळी शिरवळवाडी सदलापूर शिरवळ या परिसरातील खरीप हंगामातील तूर उडीद मुग सोयाबीन कापूस मका भुईमूग ही सर्व पिके पूर्णपणे वाया गेल्याने या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई करून देण्याची मागणी अक्कलकोट येथील तहसीलदार यांच्याकडे करण्यात आला. वागदरी परिसरात आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे या परिसरातील संपूर्ण शिवारात पाणी साचले आहे.




शेती ना तलावाचे रूप आले आहे. परिसरातील संपूर्ण पिके पाण्याखाली पाण्याखाली गेल्याने खरीप हंगामा पूर्णपणे वाया गेला आहे. नगदी म्हणून ओळखले जाणारे खरीप हंगामातील सोयाबीन उडीद मूग मका कापूस ही पिके १००% वाया गेल्याने या परिसरातील शेतकऱ्यांची खूप मोठी आर्थिक नुकसान झाला आहे. हाताला आलेली मूग व उडीद पाणी लागून सडून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तेव्हा वागदरी जिल्हा परिषद गटात संबंधित महसूल व कृषी खात्याने या परिसरातील पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य तो नुकसान भरपाई व मोबदला द्यावा अशी मागणीचे निवेदन अक्कलकोट येथील तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे वागदरीचे युवा सरपंच शिवानंद घोळसगाव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव उपसरपंच पंकज सुतार श्रीशैल ठोंबरे मल्लिनाथ ठोंबरे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शानप्पा मंगाने घालया मठपती ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत भैरामडगी बसवराज वरनाळे बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# सतत पडणाऱ्या पावसामुळे आणि अतिवृष्टीमुळे घाटकोपर पश्चिम येथील डोंगराळ भागातील घरांना धोका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विक्रोळी/केतन भोज : मागील तीन चार दिवसांपासून राज्यासह मुंबईत मुसळधार पाऊस बरसत आहे.यामुळे जनजीवन देखील विस्कळीत झाले असून अतिवृष्टी सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. घाटकोपर पश्चिम प्रभाग क्रमांक १२३ मधील डोंगराळ भागातील संत ज्ञानेश्वर सोसायटी जाधव चाळीच्या वर, जय मल्हार नगर खंडोबा टेकडी विभाग येथील रहिवाशांच्या घरांना धोका निर्माण झाला असून येथील घरांना तडे गेले आहेत. त्यामुळे येथील नागरिक आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत. तसेच मनपा एन विभागामार्फत खबरदारी म्हणून येथील दरड प्रवण क्षेत्रातील सर्व नागरिकांना सावधान नोटीस देण्यात आल्या आहेत.

यावेळी या सदर घटनेची माहिती मिळताच भारतीय जनता पार्टी चे पदाधिकारी संतोष गांजले आणि प्रवीण धुमाळ यांनी घटनास्थळी धाव घेतली.





# येडोळा येथे वर्षावास निमित्ताने भिकू संघाची धम्म देशना व विपशना कार्यक्रम संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालूक्यातील मौजे येडोळा जिल्हा धाराशिव येथे बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क भिकू संघ नवी दिल्ली या भिकू संघाची धम्म देशना व विपशना कार्यक्रम संपन्न झाला.

वर्षावास निमित्ताने बौद्ध धम्म प्रचार व प्रसार आभियान नळदुर्ग सर्कल-२२५ ता.तुळजापूर अंतर्गत बुध्दिस्ट इंटरनॅशलन भिकू संघाचे राष्ट्रीय प्रभारी सोमनंद यांची धम्मदेशना व भंते धम्मरक्षक यांची विपशना कार्यशाळ जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून भारतिय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम, रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड, रिपाइं (आठवले) चे नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, सामाजिक कार्यकर्ते शंकर भालेराव, समता सैनिक दलाचेअनिल सरतापे, कुमार ढेपे शरद बागडे, वैभव सिरसाट आदी उपस्थित होते.

प्रारंभी बुद्धिस्ट इंटरनॅशल भिकू संघ नवी दिल्लीचे राष्ट्रीय प्रभारी भदंत सोमानंद, महाराष्ट्र प्रभारी माताजी शासन मेता, माताजी विश्वमित्रा व भंते धम्मरथ यांचे येडोळा येथे आगमन होताच पुष्पांचा वर्षाव करत धम्म रॅलीने स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून बुध्द वंदनेने धम्म देशनेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी भंते शासन मेता,भंते विश्वमित्रा यांची ही धम्म देशना झाली तर भंते धम्मरक्षित यानी दोन दिवशिय विपशना (ध्यान साधना) कार्यशाळ घेतली.

या कार्नक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन समता सैनिक दलाचे लेफ्ट कर्नल एम.डी.लोंढे (पुणे) यानी केले तर अभार प्रदर्शन रामचंद्र लोंढे यानी केले. यावेळी रमेश लोंढे, देवानंद लोंढे, सुरेश लोंढे, मारुती लोंढे, अंकूश लोंढे, डॉ.सुरज लोंढे, नागेश लोंढे, अतुल कांबळे, प्रविण कांबळे, अमर जेटीथोर, अमित लोंढे, भानुदास लोंढे, अर्जुन लोंढे, सुरज गायकवाड, गौरव लोंढे सह महिला, ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुसळधार पावसामुळे वालकस पूल पाण्याखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : सतत तीन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे भिवंडी तालुक्यास जोडणारा भातसा नदीवरील तर कल्याण तालुक्यातील वालकस पूल पाण्याखाली गेल्याने वालकस,बेहरे या गावातील हजारो नागरिकांचा गेल्या तीन दिवसापासून शहराशी संपर्क तुटला आहे. यंदाच्या पावसामुळे तीन वेळा हा पूल पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून खडवलीच्या दिशेने रेल्वे रुलावरून चालत प्रवास करावा लागत आहे. वालकस पूल पाण्याखाली गेल्यामुळे हजारो नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वालकस बेहरे इथल्या ग्रामस्थांची मागील अनेक वर्षापासून खडवली रस्त्याची मागणी तशीच धूळखात पडून आहे. विशेष म्हणजे दरवर्षीप्रमाणं यंदाही भातसा नदीवरील ५१ वर्षे जुना कमकुवत पूल पाण्याखाली गेला असून रहदारीचा पर्याय चार दिवसापासून पूर्णपणे बंद आहे. अशावेळी वालकस ,बेहरे येथिल नागरिकांची कोंडी झाली आहे. गावातून बाहेर पडण्यासाठी पर्यायी रेल्वे मार्गाचा उपयोग करावा लागत आहे. दुसरा कोणताही पर्यायी रस्ता नसल्याने खडवली स्थानकाच्या दिशेने २ ते ३ किलोमीटर जीव मुठीत घेऊन रेल्वे रुळावरून नागरीकांना पायी प्रवास करावा लागत आहे. तर रेल्वे रुलावर आतापर्यंत १३



नरपराध गावकऱ्यांचा जीव गेला आहे. याच वालकस पुलावरून विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी प्रवास करावा लागतो. वालकस नदीवरील पुल व कोशिंबी ते वाळकस रस्त्याच्या कामाला २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून , वालकस पुलाच्या दोन्ही बाजूला काँक्रेट रस्ता बनवण्यात आला आहे.

### परिसरातील हजारो नागरिकांचा संपर्क तुटला

नवीन पुलाचे बांधकाम गेल्या आठ महिन्यांपासून सुरू आहे. नवीन पुलाचे बांधकाम लवकरात लवकर व्हाव यासाठी स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे. पूल लवकर व्हाव या प्रतीक्षेमध्ये सर्व गावकरी आहेत.पावसाच्या काळात नागरीकांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जायचे कसे? हा मोठा संकट परिसरातील नागरिकांच्या समोर उभा राहीला आहे.

## गोगांव सह वागदरी मंडळात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान

# शेतातील पिकांचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्या : सरपंच वनिता सुरवसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अति पाऊसामुळे गोगांव, खेराट, भुरीकवठे, वागदरी सह अनेक गावात मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झालेले असून त्या पिकांचे त्वरित पंचनामे करण्याबाबत तहसीलदार यांनी आदेश द्यावे अशी मागणी गोगांवच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी तहसीलदार,आमदार व जिल्हाधिकारी यांच्या कडे मागणी केली आहे.

वागदरी मंडल मध्ये प्रजन मापक यंत्रणा नसल्यामुळे सदर माहिती प्रशासनास कळण्यास उशिरा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील त्यांना मदत मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत. यंदा मे महिन्यात पाऊस आल्याने पेरणी लवकर करण्यात आली होती.मध्यंतरी पाऊस गेल्याने पिकाची वाढ खुंटली, परंतु गेल्या वीस पंचवीस दिवसापासून सतत पाऊस चालू असल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उडीद, मूग हे पीक काढणीस येऊन देखील पीक शेतकऱ्यांना काढता आले नाही शेतात मोठया प्रमाणात पाणी साचून शेती पिकांचे प्रचंड असे नुकसान झाले आहे.सर्व शेतकऱ्यांचे पिके पाणी लागून गेले आहे. सोयाबीन, तूर, या पिकांना पाणी लागून नुकसान झाले आहे. शेताकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून पैसे काढून बी बियाणे, खत आणून पेरणी केली आहे. यावर्षी सोलापूर जिल्हाबँक आणि सोसायट्या नी सुद्धा कर्ज पुरवठा केला नाही,त्यामुळे लोकांकडून घेतलेले कर्ज फेडायचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उपस्थित झाला आहे. जर मदत नाही मिळाली तर शेतकऱ्याकडून येत्या निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागतील हे प्रशासन आणि सरकारने ध्यानात घ्यायला हवे. यासाठी शासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी मदत त्वरित करावी अशी मागणी सरपंच वनिता सुरवसे यांनी केली आहे.






**वागदरी मंडल मध्ये मोठे पाऊस होऊन शेतीचे मोठे नुकसान झाले आहे वागदरी मंडल मध्ये प्रजन मापक यंत्रणा नसल्याने यांची माहिती प्रशासनास मिळणे अवघड आहे त्यासाठी या मंडल मधील सर्व ग्रामपंचायत यांनी ग्रामसभेत शेतीच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत ठराव घेण्यात यावे**

**- कमलाकर सोनकांबळे, उपसरपंच, गोगांव**

# विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गतच्या २२३ जातींना न्याय मिळाला पाहिजे : समिती प्रमुख सुहास कांदे

## महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमातीकल्याण समितीकडून जिल्हा परिषद, महानगरपालिका व सर्व नगरपालिकांचा आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गत २२३ जातींचा समावेश आहे. या सर्व जातींना शासकीय पद भरती, आरक्षण व अनुशेष या अंतर्गत शासकीय धोरणाप्रमाणे सर्व विभागामध्येसमाविष्ट करून घेण्याबरोबरच शासकीय योजनेचा लाभ ही शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलापाहिजे. या सर्व जातींना न्याय मिळालापाहिजे अशी भूमिका समितीची असून त्याची तपासणी समितीमार्फत अत्यंत काटेकोरपणेकरण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्रविधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे प्रमुख तथा आमदारसुहास कांदे यांनी दिले.

शासकीयविश्रामगृह येथील सभागृहात आयोजित जिल्हा परिषद महानगरपालिका व सर्व नगरपालिकांच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गत च्या कामाचा आढावा समितीनेघेतला, त्याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून आमदारश्री. कांदे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार उमेश यावलकर, आमदार अनिल मांगरूळकर, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय चे कक्ष अधिकारी विनोदराठोड, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारीवीणा पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, इतर बहुजन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, तहसीलदारश्रीकांत पाटील, सर्व गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी समिती प्रमुख तथा आमदार श्री. कांदेम्हणाले की, राज्यातील विमुक्त जाती वभटक्या जमातीच्या शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्याशासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनीत्यांच्या अधिनस्त विभागात शासकीय नियमाप्रमाणे या समाजातील नागरिकांना लाभ मिळतआहे की नाही याची सविस्तर माहिती समितीला सादर करावी. या प्रवर्गातील नागरिकांचीरिक्त असलेली पदे तात्काळ भरावीत. एकही पद कोणत्याही कारणाशिवाय रिक्त राहणार नाहीयाची सर्वस्वी जबाबदारी त्या त्या विभाग प्रमुखाची आहे, असेहीत्यांनी निर्देशित केले. जिल्हापरिषद, महानगरपालिका व सर्व नगरपालिका मध्ये ज्याकर्मचाऱ्यांच्या भरत्या झालेल्या आहेत परंतु जात वैधता प्रमाणपत्र सहा महिने झाले-तरी सादर केलेले नाही अशा सर्व कर्मचाऱ्यांची माहिती द्यावी. तसेच यातील जेप्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत ती ही यादी सादर करावी. सहा महिने झाले तरीकर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही आशा कर्मचाऱ्यांना शासकीयसेवेतून बडतर्करण्याबाबतची कारवाई संबंधित यंत्रणा प्रमुखांनी करावी, असे निर्देशही श्री. कांदे यांनी दिले. विमुक्त जाती व भटक्या जमातीप्रवर्गातील छोट्या छोट्या जाती मधील नागरिकांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांचेहक्क इतर कोणीही हिरावून घेणार नाही याची दक्षता प्रशासकीय यंत्रणांनी घेतलीपाहिजे असेही त्यांनी सुचित केले.




महानगरपालिका व सर्व नगरपालिकानेत्यांच्या उत्पन्नाच्या पाच टक्के निधी विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकल्याणासाठी खर्च केला पाहिजे. यामध्ये मंजूर असलेला निधी ५० टक्के रस्ते तर ५० टक्के चांगल्या व्यायाम शाळा तसेच वाचनालययावर खर्च करावा. तसेच शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील गाळेवाटप ही या समाजातीलनागरिकांना शासकीय नियमाप्रमाणे होईल याची दक्षता घ्यावी, असेहीश्री. कांदे यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदे अंतर्गत सर्व घरकुल योजनांचाआढावा घेऊन या अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभार्थ्यांना शंभर टक्केघरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देशसमितीने दिले.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारीकुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषद अंतर्गत नियुक्त जाती व भटक्या जमाती मधीललाभार्थ्यांना देण्यात येत असलेल्या घरकुलांच्या लाभाविषयी माहिती दिली. महापालिकाआयुक्त श्री. ओंबासे यांनी महापालिके अंतर्गत पदभरती व अनुशेष याची माहिती दिली तर नगरपालिका प्रशासन अधिकारी श्रीमती पवार यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिका अंतर्गतविमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांना पदभरती, आरक्षण व अनुशेष तसेच शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील गाळेवाटप आरक्षण याविषयी सविस्तर माहिती दिली.

# बैलपोळा सणासाठी सजल्या बाजारपेठ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



उमरगा/प्रतिनिधी : बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ गजबजली आहे. शेतकऱ्यांनी बैलजोडीच्या साजशृंगारासाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी सुरू केली आहे.

यंदा दमदार पावसामुळे खरीप पिकांनी बहर धरला आहे. हिरवेगार शिवार आणि सोनेरी पीक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत आहेत. अपेक्षित उत्पन्नामुळे बळीराजाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यातच कृषी संस्कृतीत महत्त्वाचे स्थान असलेला बैलपोळा साजरा करण्याचा उत्साह वाढला आहे. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांकडून जय्यत तयारी केली जात आहे. गेल्या काही वर्षांत सततचा दुष्काळ, बदलते हवामान, तसेच शेतीत वाढत्या तंत्रज्ञानाचा वापर यामुळे पशुधनात लक्षणीय घटझाली आहे. मात्र, पोळा सणाचे पारंपरिक आणि सांस्कृतिक महत्त्व ग्रामीण भागात आजही कायम टिकून आहे. शहरातील बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी दोऱ्या, मण्यांच्या माळा, झुली, सजावटीचे कापड, घंट्या, तेल, गूळ, फराळासाठी लागणारे साहित्य अशा आकर्षक वस्तूंनी दुकाने फुलून गेली आहेत. शुक्रवारी पोळा असल्याने शेतकऱ्यांच्या घराघरांत सध्या बैल पोळा सणाच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे.

# बी.ए.एलएल.बी.साठी २१ ऑगस्ट पासून तर एलएल.बी. साठी २४ ऑगस्ट पासून कॅप राऊंड-३ प्रक्रिया सुरु




**स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'बारावी उत्तीर्ण झालेल्या व लॉ प्रवेशासाठी सीईटी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी पाच वर्ष कालावधी असलेल्या बी.ए.एलएल.बी. (विधी) प्रवेशाचा कॅप राऊंड ३ हा गुरुवार, दि.२१ ऑगस्ट २०२५ ते शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ पर्यंत तर पदवी नंतर तीन वर्ष कालावधी असलेल्या एलएल. बी. (लॉ) च्या कॅप राऊंड ३ साठी रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५ पासून ते बुधवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ पर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे व 'स्वेरी लॉ कॉलेज'चे प्राचार्य डॉ. यु. एम. राव यांनी दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असून केवळ पैसा आणि वेळ यांचा व्यवस्थित समन्वय साधता न आल्याने शिक्षण घेण्याची इच्छा असतानाही व्यावसायिक शिक्षण घेता येत नव्हते हे पाहून स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांनी शिक्षणाचे महत्व ओळखले आणि १९९८ साली गोपाळपूर (ता. पंढरपूर) च्या माळरानावर तंत्रशिक्षण संस्था काढली, परिश्रम करत संस्था व्यवस्थित टिकवून ठेवली, त्यात सातत्य राखले. त्यामुळे स्वेरीला शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळत राहिले. वाढत्या यशामुळे पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिकांची अपेक्षा वाढली. स्वेरीमध्ये पुढे डिप्लोमा, फार्मसी, एम.बी.ए., एम.सी.ए., पीएच.डी. हे अभ्यासक्रम देखील नागरिकांच्या अपेक्षेनुसार वाढविले. त्यांनाही आता अभूतपूर्व यश मिळत आहे. हे पाहून नागरिकांची अपेक्षा आणखी वाढली आणि पालकांच्या मागणीनुसार विधी (एल.एल.बी.) शिक्षण सुरू करण्याचे ठरविले. स्वेरीतील विधी शिक्षणाचे यंदाचे हे पहिलेच वर्ष असून त्याला शासनाकडून आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाची देखील मान्यता मिळाली आहे. त्यामुळे स्वेरी कॅम्पस मध्ये असलेल्या नव्या इमारतीत हे शिक्षण यंदापासून सुरु झाले आहे. त्यासाठी रजिस्ट्रेशन प्रक्रिया देखील झाली आहे. शिक्षणासाठी पोषक असलेल्या वातावरणात विधी शिक्षण सुरु झाले असल्यामुळे पंढरपूर पंचक्रोशीत भावी वकिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने एल.एल.बी. (तीन वर्ष व पाच वर्षे) प्रवेश प्रक्रिया पूर्वीच सुरु झाली असून ज्यांनी तीन वर्ष कालावधी असलेल्या एलएल. बी. (विधी) च्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा दिली आहे परंतु काही अडचणींमुळे रजिस्ट्रेशन करण्याचे राहून गेले आहे अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष नुकसान होऊ नये यासाठी रजिस्ट्रेशन करणे, ए फॉर्म भरणे यासाठी रविवार, दि.०३ ऑगस्ट २०२५ ते गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदत दिली आहे. तसेच पाच वर्ष कालावधी असलेल्या एल. एल. बी. (विधी) च्या प्रवेशासाठी शुक्रवार, दि.०१ ऑगस्ट २०२५ ते शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदत दिली आहे. दिलेल्या अवधीत विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करून ऑप्शन फॉर्म भरता येणार आहे. कॅप राउंड नंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना विधी शिक्षणासाठी महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. तसेच 'एमएएच- एलएलबी सीईटी २०२५' ही परीक्षा दिलेली असावी. असे पात्र विद्यार्थी एल.एल.बी. मध्ये प्रवेश घेऊ शकतात. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, प्राचार्य डॉ. यु. एम. राव यांच्या नेतृत्वाखाली व तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध केली आहे. एल.एल.बी. (३ वर्षे) व बी.ए.एलएल.बी. (५ वर्षे) च्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व समाधान मोरे (मोबा.नं.-९६३७३८२६७०) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज भाळवणीमध्ये गुरुकुल शिक्षक,पालक-विद्यार्थी सुविचार सभा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाळवणी/प्रतिनिधी :न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स भाळवणी तालुका पंढरपूर येथे सन २०२५ २६ या शैक्षणिक वर्षातील गुरुकुल शिक्षक पालक विद्यार्थी सहविचार सभा संपन्न झाली.

सदर सहविचार सभेमध्ये विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. गुरुकुल प्रमुख रणजीत दडस यांनी गुरुकुल उपक्रमांतर्गत वर्षभर राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची उपस्थित पालकांना माहिती दिली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक के डी शिंदे यांनी बोलताना सांगितले की पालक आणि शिक्षक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांची प्रगती निश्चित करता येईल. विद्यालयाचा भौतिक व गुणात्मक विकास करण्यासाठी पालकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. पालक मनोगत मधून नागने, राहुल हातगिने यांनी शिक्षक करत असलेल्या कामाबद्दल शिक्षकांचे कौतुक केले.अनेक पालकांनी सूचना मांडल्या त्यावर सकारात्मक चर्चा झाली. पालक मेळाव्यासाठी हरिभाऊ शिंदे ,सरपंच रणजीत जाधवॉ, प्रशांत माळवदे व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भारत विधाते यांनी व आभार एस एच शिंदे यांनी मानले.

# परीक्षा पास होण्यासाठी अभ्यास न करता ज्ञान मिळण्यासाठी अभ्यास करा : किरण डाके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




वैराग : उत्तम नागरिक म्हणून जगण्यासाठी विद्यार्थ्यांनी फक्त परीक्षा पास होण्यासाठी अभ्यास न करता ज्ञान मिळण्यासाठी अभ्यास केला पाहिजे . योग्य मार्गदर्शनाबरोबर योग्य सहवासाच्या पुस्तकासोबत तुमचं आयुष्य घडत गेले पाहिजे .असे मार्गदर्शन पर विचार नव नियुक्त सहाय्यक महापालिका आयुक्त किरण डाके यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. मानेगाव येथील संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सोमवारी राजर्षी स्टडी सर्कल अभ्यासिकेचे उद्घाटन तसेच गरीब ,निराधार व भटक्या समाजातील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. मानेगाव येथे १८ ऑगस्ट रोजी सोमवारी सायंकाळी राजर्षी स्टडी सर्कल या सार्वजनिक अभ्यासिकेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षेतून नव नियुक्त सहाय्यक महापालिका आयुक्त किरण डाके यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी डॉ. प्रवीण मासाळ ,नगरसेवक श्रीशैल भालशंकर ,आरपीआय तालुका अध्यक्ष दत्तात्रय क्षिरसागर ,श्री कोचिंग क्लासेस चे अमोल माने ,एस पी कोचिंग क्लासेस चे लहू शिंदे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रवीण भालेराव ,राहुल दळवी ,राहुल भालशंकर ,प्रवीण लोंढे, सिद्धेश्वर लोखंडे , दिपक जेटीथोर यांनी परिश्रम घेतले. यावेळी कालिदास देवकते यांनी सूत्रसंचालन केले . तर आभार संस्थेचे अध्यक्ष बलभीम लोखंडे यांनी मानले.

### आर्थिक सक्षमीकरणाचे महिलांना दिले धडे

### महिलांनी तारपा नृत्यावर धरला ठेका

# पडघा येथे महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत भरारी लोकसंचालित साधन केंद्राची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महांडळ, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र शासन अंगिकृत) नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत भरारी लोकसंचलित साधन केंद्र पडघा यांची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा महिलांना मार्गदर्शन करत १८ ऑगस्ट २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा महाजन वाडी हॉल येथे संपन्न झाली.

या सभेत अजेंड्यातील विषयांवर चर्चा करून मंजुरी देण्यात आली. भरारी लोकसंचालीत साधन पडघा केंद्राच्या व्यवस्थापक विद्या गायकवाड यांनी प्रोजेक्टरच्या माध्यमातून सन २०२४-२५ चा आर्थिक आढावा सादर केला तसेच २०२५-२६ चे नियोजन उपस्थितांसमोर मांडले. मागील वर्षातील उपक्रम, महिला गटांच्या प्रगतीचा आलेख, तसेच पुढील वर्षासाठी ठरवलेली उद्दिष्टे यांचे सविस्तर विवेचन करण्यात आले.यावेळी नवीन कार्यकारिणी मंडळाला एकमताने मंजुरी देऊन त्यांचे स्वागत आणि सत्कारही करण्यात आला. यावेळी तालुका कार्यक्रम व्यवस्थापक पंढरी भला, माविम ठाणेच्या लेखाधिकारी माधुरी देवीकर ,तालुका सहनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी पूनम कोंगेरे, माविम मित्र मंडळाचे अध्यक्ष पंकज भोईर ,ऍक्सेस डेव्हलपमेंट संस्थेचे राम कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.कवी ,पत्रकार मिलिंद जाधव यांनी घरोघरी आता सावित्री हाय कविता सादर केली. यावेळी महिलांनी तारपा नृत्य सादर करत उपस्थितांचे मने जिंकली. सी.एम. आर.सी अंतर्गत उत्कृष्ट गट उत्कृष्ट ग्रामसंस्था यांना गौरवण्यात आले.तसेच लोकसंचालीत साधन केंद्रामध्ये कार्यरत समुदाय संसाधन स्टाफ यांना प्रशस्तीपत्रक, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.तर महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिलांचे उद्योग व्यवसायाची क्षमता वाढण्यासाठी महिलांसाठी ऍक्सेस डेव्हलपमेंट संस्थेच्या वतीने भाजी आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते.यावेळी पंचायत समितीच्या माजी सदस्या आशा मोरे , माविम ठाणे लेखाधिकारी माधुरी देवीकर, जिल्हा सहाय्यक सहनियंत्रण अधिकारी अशोक वातास,



तालुका कार्यक्रम व्यवस्थापक पंढरी भला ,तालुका सहनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी पूनम कोंगेरे, भरारी लोकसंचालीत साधन पडघा केंद्राच्या अध्यक्षा रंजुषा जाधव , भरारी लोकसंचालीत साधन पडघा केंद्राच्या व्यवस्थापक विद्या गायकवाड, बँक ऑफ बडोदा शाखा व्यवस्थापक पराग, माविम मित्र मंडळाचे अध्यक्ष पंकज भोईर, कवी ,पत्रकार मिलिंद जाधव, ऍक्सेस डेव्हलपमेंट संस्थेचे सहकारी राम कांबळे , वैशाली सावंत इतर अध्यक्ष ,माविम मित्र मंडळ, सी आर. पी. सदस्या , लेखापाल व सहयोगिनी , उपजीविका सल्लागार ,पडघा परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रम व्यवस्थित पार पडण्यासाठी सी.एम. आर. सी.कार्यकारिणी सभासद, व सी.आर.पी, सी.एम. आर.सी स्टाप यांचे मोलाचे सहकार्य लाभले.आर्थिक स्वावलंबन, आरोग्यदायी जीवनशैली व सांस्कृतिक जाणीव यांचा संगम घडवणारी ही सभा महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देऊन संस्मरणीय ठरली.